महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

**जा.क्र.**तंशिविकापू/शैक्षणिक वि -५ / २०२५-२६ / 1669 दिनांकः १५ मे २०२६

परिपत्रक

प्रति,
संचालक / प्राचार्य
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय: पश्चिम आशियाई संकटाच्या पाश्वभूमीवर राज्य शासनाव्दारे करण्यात येणाऱ्या उपाययोजनाबाबत

संदर्भ : १) शासन परिपत्रक ,सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक ई.१०२२४६४८ दि. १३/०५/२०२६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन परिपत्रकानुसार पश्चिम आशियाई संकटाच्या पाश्वभूमीवर राज्य शासनाव्दारे उपाय योजना प्रस्तावित केल्या आहेत. या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व अभ्यासक्रमाच्या संस्थाना सूचित करण्यात येते की आपल्या संस्थेमध्ये शासनाच्या वरील प्राप्त निर्देशानुसार तात्काळ अमलबजावणी करावी.

सोबत-वरीलप्रमाणे

( डॉ.द.व्यं.जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत :१) प्रोग्रामर , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळा वर प्रदर्शित करण्याकरिता
२) या विभागीय कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांना उचित कार्यवाहीसाठी
३) ३) उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीकरीता

पश्चिम आशियाई संकटाच्या पाश्वभूमीवर
राज्य शासनाव्दारे करण्यात येणाऱ्या
उपाययोजना.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.ई-१०२२४६४८
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १३ मे, २०२६

**शासन परिपत्रक:-**

मा. पंतप्रधान महोदयांनी पश्चिम आशियाई संकटाच्या पाश्वभूमीवर देशातील नागरिकांना आवाहन केले आहे ज्यामध्ये, घरुन काम करण्याची मुभा (Work From Home), अनावश्यक सोने खरेदी टाळणे, पेट्रोल व डिझेल चा वापर कमी करुन सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करणे, खाद्यतेलाचा वापर कमी करणे, रासायनिक खतांवरील अवलंबिता कमी करुन नैसर्गिक शेती करणे, स्वदेशी उत्पादनांचा वापर वाढविणे व परदेश दौरे टाळणे इ. बाबींचा समावेश आहे.

**या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुढील उपाय योजना प्रस्तावित केल्या आहेत:**

१. परकीय चलनाचे संवर्धन करण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी अभ्यास/शासकीय कामाकरीता मंजूर असलेल्या परदेश दौरे रद्द करण्यात यावेत व नविन दौऱ्यांचे नियोजन करु नये.
२. दैनंदिन वापराकरीता बाह्यस्त्रोताव्दारे घेण्यात येणाऱ्या वाहनांमध्ये इलेक्ट्रीक वाहने वापरण्यास प्राधान्य देण्यात यावे.
३. कार्यालयीन कामानिमित्त नियोजित स्थळभेटी दरम्यान कमीत कमी वाहनांचा वापर करावा.
४. अधिकाऱ्यांनी एकत्रित दौरा करताना carpooling व्दारे प्रवास करण्याचे नियोजन करावे.
५. अधिकारी / कर्मचारी यांनी सद्यस्थितीत कार्यालयीन कामकाजाकरीता दौरे आवश्यक असल्यास सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा.
६. वरिष्ठ अधिकारी यांनी आठवड्यातील एक दिवस मेट्रोने/लोकलने/सार्वजनिक बसने प्रवास करावा.
७. इलेक्ट्रीक वाहनांची चार्जिंग यंत्रणा सक्षम करणे व त्यासाठीचे लागणारे विजेचे दर कमी करण्याबाबत विचार करावा. व चार्जिंग सेंटर उभारण्याकरीता प्रलंबित असलेल्या व नव्याने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना तातडीने मान्यता द्यावी.
८. मंत्रालयीन स्तरावरील, विभागीय स्तरावरील व जिल्हास्तरावरील शासकीय बैठका,प्रशिक्षण, सेमिनार इ. आयोजित करणे आवश्यक असल्यास VC प्रणालीचा वापर करण्यात यावा.

९. सर्व बैठका, प्रशिक्षण, चर्चासत्रे इत्यादी ऑनलाइन पद्धतीने आयोजित करावे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी याचे पालन सुनिश्चित करावे.

१०. पोलीस विभागाने कोणत्याही प्रयोजनाकरीता दुचाकी फेऱ्या (bike rallies), वाहनांच्या मिरवणूका, वाहनांचा ताफा इ. साठी परवानगी देण्यात येऊ नये.

११. माहिती व जनसंपर्क तसेच, कार्यन्वयन यंत्रणेने माफक प्रमाणात शासकीय जाहिराती प्रसारित कराव्यात आणि अनावश्यक खर्च टाळावा. खर्चिक तंत्रज्ञानाचा (डेकोरेटीव्ह लाईट्स इ.) वापर कमीत कमी करावा. फ्लेक्स, बॅनर यांचा कमीत कमी वापर करावा व प्रकाशित होर्डिंग्जसाठी डीजी सेटचा वापर करण्यात येऊ नये.

१२. कार्यालयीन कामाकरीता नैसर्गिक प्रकाशाचा वापर करुन, अनावश्यक विद्युत दिव्यांचा वापर टाळावा. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, संगणक, वातानुकूलीत यंत्रणा, उद्वाहन इ. उपकरणे बंद करावीत. तसेच, वातानुकूलीत यंत्रणेचे तापमान २४-२६ अंशावर ठेवावे.

१३. "प्रधानमंत्री सुर्यघर" योजनेंतर्गत जास्तीत जास्त घरांवरती सौरऊर्जा यंत्रणा बसविण्यासाठी भर देण्यात यावा.

१४. खाद्यतेलाचा वापर कमी करण्यासाठी कॅन्टीन, मध्यान्ह भोजन, अंगणवाडी, वसतिगृहे, तुरुंग, पोलीस भोजनालये, रुग्णालये यांनी त्यानुसार मेन्यूमध्ये बदल करावेत. आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका यांनी घरांना खाद्यतेलाचा वापर कमी करण्यासाठी समुपदेशन करावे. पाम/सोयाबीन/सूर्यफूल तेलाऐवजी मोहरीचे तेल, शेंगदाणा तेलाला प्रोत्साहन द्यावे.

१५. PNG चा वापर मोठ्या प्रमाणात करण्यासाठी PNG च्या जोडण्यांना प्रलंबित असलेले प्रस्ताव व नव्याने प्राप्त होणारे प्रस्तावांना तातडीने परवानगी देण्यात यावी.

१६. मुंबई आणि इतर मोठ्या शहरांमधील रेस्टॉरंट, हॉटेल्स यांनी अनिवार्यपणे पीएनजी (PNG) चा वापर करण्यासाठी प्रवृत्त करावे.

१७. प्रधानमंत्री उज्वला योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी दुबार नोंद असलेले ग्राहक शोधून त्यांची नोंदणी रद्द करण्यात यावी. तसेच, सर्वसाधारण ग्राहकांमधील बोगस, दुबार, स्थलांतरीत इ. ग्राहक शोधून त्यांची नोंदणी रद्द करण्यात यावी जेणेकरुन खऱ्याखुऱ्या ग्राहकांना योजनेचा लाभ घेता येईल.

१८. रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी, नैसर्गिक, जैविक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी, खतांच्या योग्य वापरासाठी अॅग्रीस्टॅकवर नोंदणी करण्यासाठी, युरियाचा गैर-शेती कामांसाठी होणारा गैरवापर रोखण्यासाठी, खतांचा वापर तर्कसंगत करण्यासाठी माती परिक्षण करुन पीकनिहाय आणि प्रदेशनिहाय सूचना निर्गमित करण्यासाठी कृषी विभागाकडून मोहीम राबविण्यात यावी.

१९.सर्व प्रशासकीय विभागांनी पुढील ६ महिन्यांसाठी सल्लागार यांची नेमणूक करण्याचे टाळावे.

सर्व प्रशासकीय विभाग,विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी वरील सूचनांचे योग्यरित्या पालन होईल याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक202605141103458007 असा आहे हा आदेश डीजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJESH AGGARWAL

Digitally signed by RAJESH AGGARWAL

(राजेश अग्रवाल)

मुख्य सचिव

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा. सभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५) मा. उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
६) मा. अध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
७) मा. उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
८) मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
९) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
१०) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
११) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)
१५) सर्व महानगर पालिका आयुक्त / नगरपालिका मुख्याधिकारी
१६) सर्व महामंडळे / विद्यापीठे